मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये सोसायट्यांवर मालमत्ताकराचा भार वाढला

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 2026-27 बिलात नव्या कर आकारणीमुळे नागरिक नाराज

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सन 2026-27 वर्षातील बिलात हाऊसिंग सोसायटीतील पार्किंग तसेच, ॲमेनिटीज स्पेसलाही मालमत्ताकर लावण्यात आल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. सोसायट्यांना मूलभूत नागरी सुविधा न देता अशा प्रकारे कर वसूल करण्याची पद्धत अन्यायकारक आहे. महापालिका प्रशासनाच्या या प्रकारामुळे सदनिकाधारकांवर आर्थिक बोजा वाढत असल्याची भावना निर्माण झाली आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे शहरातील 7 लाख 44 हजार 630 निवासी व बिगरनिवासी मालमत्तांची नोंद आहे. त्यात सर्वाधिक संख्येने निवासी मालमत्तांचा समावेश आहे. शहरातील लाखो मालमत्तांची महापालिकेकडे नोंद नव्हती. त्यामुळे महापालिकेने खासगी एजन्सी नेमून शहरात नोंद नसलेल्या आणि वापरात बदल केलेल्या मालमत्तांचा शोध घेतला. त्यात साडेतीन लाखांपेक्षा अधिक नोंद नसलेल्या मालमत्तांचा शोध घेण्यात आल्याचा दावा महापालिकेच्या करसंकलन विभागाने केला आहे.

शहरातील अनेक हाऊसिंग सोसायट्या आणि अपार्टमेंटमधील सामूहिक पार्किंगची नोंद मालमत्ताकरात नव्हती. त्या खासगी एजन्सीने सर्व हाऊसिंग सोसायट्या व अपार्टमेंटमधील सामूहिक पार्किंग, ॲमेनिटीज स्पेस, उद्यान, क्रीडांगण, क्लब हाऊस, व्यायाम शाळा, सभागृह, जलतरण तलाव, स्वच्छतागृह, एसटीपी, कंपोस्ट खत निर्मिती केंद्र आदींना त्या एजन्सीने निवासी दराने मालमत्ताकर लावला आहे. ती नोंद नव्याने झाल्याने यंदाच्या चालू आर्थिक वर्षातील सन 2026-27 च्या मालमत्ताकर बिलात सोसायटीचे पार्किंग व ॲमेनिटीज स्पेसला मालमत्ताकर लावल्याचे निर्देशनास आले आहे. त्यामुळे खडबडून जागे झालेल्या सदनिकाधारकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. ॲमेनिटीज स्पेसमध्ये नागरी सुविधा निर्माण केल्या जातात. उद्यान, बाग, क्रीडांगण, जलतरण तलाव, व्यायामशाळा, क्लब हाऊसची सुविधा असते. तसेच, मोकळ्या जागेत झाडे लावलेली असतात. त्या सर्व जागांनाही मालमत्ताकर लावण्यात आला आहे.

सदनिकाधारक वर्षाकाठी 10 ते 30 हजार रुपये मालमत्ताकर भरत आहेत. आता, या नव्या करामुळे सदनिकाधारकांवर आणखी आर्थिक बोजा पडणार आहे. तसेच, सोसायट्यांवरही मोठा भार पडणार आहे. या नव्याने लागू करण्यात आलेल्या मालमत्ताकरामुळे मोठ्या हाऊसिंग सोसायट्यांना दीड ते दोन लाखांचा कर लावण्यात आला आहे. या नव्या आर्थिक ताणामुळे सोसायटीचे धाबे दणाणले आहेत. पार्किंग, ॲमेनिटीज स्पेसला लावण्यात आलेला तो कर अन्यायकारक असल्याने त्याला विरोध होत आहे.

### हाऊसिंग सोसायट्यांचा विरोध

**» शहरातील काही हाऊसिंग सोसायट्यांनी या मालमत्ताकराला विरोध केला आहे. पार्किंग आणि ॲमेनिटी स्पेसच्या जागा कोणत्याही व्यावसायिक फायद्यासाठी नाहीत. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या मूलभूत नागरी सुविधांसाठी आहेत. त्यामुळे या ओपन ॲमेनिटीजवर मालमत्ताकर लावणे अन्यायकारक आहे. तो रद्द करण्याची मागणी सोसायट्यांकडून करण्यात येत आहे.**

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये भव्य वृक्षारोपण

## 'एक वृक्ष लावू, पर्यावरण वाचवू'चा संदेश; नागरिक, विद्यार्थी आणि लोकप्रतिनिधींचा उत्स्फूर्त सहभाग

**पिंपरी | प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून हरित आणि निरोगी भविष्याच्या निर्मितीसाठी पिंपरी-चिंचवड शहरातील छत्रपती श्री शिवाजी पार्क येथील जॉगर्स पार्क परिसरात नुकताच एक भव्य वृक्षारोपण कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवीभाऊ लांडगे आणि पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. "एक वृक्ष लावू, पर्यावरण वाचवू" या उदात्त भावनेतून



आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात स्थानिक नगरसेवकांनी पुढाकार घेत पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश दिला. वाढते प्रदूषण आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वृक्षारोपण ही काळाची अत्यंत महत्त्वाची गरज असून, पर्यावरण संवर्धन ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याची भावना या वेळी मान्यवरांनी व्यक्त केली.

या विशेष उपक्रमाला राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये प्रामुख्याने स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, स्थानिक नगरसेवक कुंदन गायकवाड, नगरसेविका योगिताताई नागरगोजे आणि रिटाताई सानप यांनी सहभाग नोंदवला. तसेच, सामाजिक कार्यकर्ते सचिन सानप आणि ज्ञानेश्वर नागरगोजे यांच्यासह 'बिकन हायस्कूल'च्या विद्यार्थ्यांनीही मोठ्या हिरिरीने या वृक्षारोपणात भाग घेतला. विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, पर्यावरणप्रेमी आणि प्रभागातील जागरूक नागरिक मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले होते. आज लावलेले प्रत्येक रोपटे हे केवळ एक दिवसाचे कार्य नसून, भावी पिढ्यांसाठी एक शाश्वत, हरित आणि निरोगी भविष्य घडविण्याचा दृढ संकल्प आहे, असा विश्वास उपस्थित सर्वच घटकांनी व्यक्त केला. शालेय विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे या कार्यक्रमाला एक वेगळीच ऊर्जा मिळाली असून, समाजात पर्यावरण रक्षणाबाबत अधिक जागरूकता निर्माण होण्यास या उपक्रमामुळे मोठी मदत होणार आहे.

# संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यासाठी नवा हायटेक रथ तयार

## 341व्या आषाढी वारीसाठी 4 टन वजनाचा आधुनिक रथ अंतिम टप्प्यात; 300 किलो चांदीचा मुलामा आणि सुबक कोरीव काम

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या ३४१ व्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्यासाठी अत्याधुनिक आणि आकर्षक असा नवीन पालखी रथ तयार करण्यात येत असून, या रथाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

रथावरील नक्षीकाम दक्षिणात्य स्थापत्यशैलीवर आधारित असून, विविध धार्मिक व सांस्कृतिक प्रतिकृतींमुळे रथ अधिक देखणा आणि भव्य बनत आहे. याशिवाय, रथावरील लाकडी कोरीव कामावर सुमारे ३०० किलो चांदीचा मुलामा व सजावटीचे काम करण्यात येत आहे. त्यामुळे रथाचे सौंदर्य अधिक खुलून येणार आहे.

विशेष म्हणजे, नवीन रथामध्ये सुमारे दोन टन बर्मा टीक सागवानी लाकडाचा वापर करण्यात आला असून, रथाचे एकूण वजन सुमारे चार टन आहे. मात्र, जुन्या रथाच्या तुलनेत हा रथ सुमारे ६०० किलोने हलका असणार आहे. त्यामुळे पालखी सोहळ्यादरम्यान बैलजोडींना रथ ओढणे अधिक सुलभ होणार असून, वारीदरम्यान सुरक्षितता व स्थिरताही वाढणार आहे. रथाच्या बांधकामात मजबुतीसह आधुनिक तांत्रिक बाबींचाही विचार करण्यात आल्याने तो अधिक टिकाऊ व दीर्घकाळ वापरण्यायोग्य ठरणार आहे.



### रथासाठी कर्नाटकातील लाकडांचा वापर

» नवीन पालखी रथाच्या निर्मितीसाठी कर्नाटक राज्यातील दांडोली परिसरातून आणलेल्या उच्च दर्जाच्या बर्मा टीक (सागवान) लाकडांचा वापर करण्यात आला आहे. रथ निर्मितीसाठी सुमारे १५० घनफूट लाकूड वापरण्यात आले असून, त्यावर अत्यंत सुबक व कलात्मक कोरीव नक्षीकाम करण्यात आले आहे. हे कोरीव काम राजस्थान राज्यातील सिरोही गावात कोंढवा येथील स्वामी आर्टचे सुरेश मिस्त्री यांनी कुशल कारागिरांकडून करून घेतले असून, त्यासाठी जवळपास दोन महिन्यांचा कालावधी लागला आहे.

त्यामुळे जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा आषाढी पायीवारी सोहळा हायटेक रथातून संपन्न होणार आहे. हा रथ बर्माटिक लाकडापासून बनवण्यात आला असून, या लाकडावर दाक्षिण्य शैलीत कोरीव असे नक्षीकाम करण्यात आले आहे. त्याला तीनशे किलो चांदीचा मुलामा देण्यात येणार आहे. या रथाचे वजन पहिल्या रथापेक्षा सहाशे किलोने कमी असणार आहे.

### पारंपरिकता आणि आधुनिकतेचा संगम

» संगम साधणारा हा रथ यंदाच्या आषाढी वारीचे विशेष आकर्षण ठरणार आहे. त्यामुळे जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा आषाढी पायीवारी सोहळा हायटेक रथातून संपन्न होणार आहे. हा रथ बर्माटिक लाकडापासून बनवण्यात आला असून, या लाकडावर दाक्षिण्य शैलीत कोरीव असे नक्षीकाम करण्यात आले आहे. त्याला तीनशे किलो चांदीचा मुलामा देण्यात येणार आहे. या रथाचे वजन पहिल्या रथापेक्षा सहाशे किलोने कमी असणार आहे.

### ७ जुलैला श्रीक्षेत्र देहू येथून पंढरपूरकडे प्रस्थान

» यंदा जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांचा ३४१ वा आषाढी पायी वारी पालखी सोहळा ७ जुलै रोजी श्रीक्षेत्र देहू येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. त्यापूर्वी नवीन पालखी रथाचे सर्व काम पूर्ण करून तो सेवेसाठी सज्ज करण्यात येणार असल्याची माहिती श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्त दिलीपमहाराज मोरे, वैभवमहाराज मोरे तसेच पालखी सोहळा प्रमुख विक्रमसिंह मोरे यांनी दिली.

नवीन पालखी रथाच्या निर्मितीसाठी कर्नाटक राज्यातील दांडोली परिसरातून आणलेल्या उच्च दर्जाच्या बर्मा टीक (सागवान) लाकडांचा वापर करण्यात आला आहे. रथ निर्मितीसाठी सुमारे १५० घनफूट लाकूड वापरण्यात आले असून, त्यावर अत्यंत सुबक व कलात्मक कोरीव नक्षीकाम करण्यात आले आहे. हे कोरीव काम राजस्थान राज्यातील सिरोही गावात कोंढवा येथील स्वामी आर्टचे सुरेश मिस्त्री यांनी कुशल कारागिरांकडून करून घेतले असून, त्यासाठी जवळपास दोन महिन्यांचा कालावधी लागला आहे.

# पिंपरी चिंचवड शहरात अनधिकृत बांधकामांवर पालिकेचा ‘नवा फंडा’

## प्रशासनाच्या आदेशाला न जुमानता उभारल्या जाणाऱ्या बेकायदा इमारतींवर लावले नोटिशीचे फ्लेक्स बोर्ड

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात अनधिकृत बांधकामे जोमात सुरू असून, महापालिका प्रशासनाच्या आदेशाला न जुमानता तीनपासून सहा मजल्यापर्यंत इमारती दाटीवाटीने उभ्या राहत आहेत. यावरून शहरात अनधिकृत बांधकामांचे पेव फुटल्याचे स्पष्ट होत आहे. त्यासंदर्भात मोठ्या प्रमाणात तक्रारी येत असल्याने सदर अनधिकृत इमारतींच्या बांधकामावर महापालिकेने नोटिशीचे फ्लेक्स बोर्ड लावण्याचा नवा फंडा राबवला आहे.

महापालिकेच्या ‘फ’ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात निगडी येथील रुपीनगर मेन रोड, तळवडे येथील गजानन हौसिंग सोसायटी परिसरात सुरू असलेल्या चार आरसीसी स्वरूपातील बांधकामांवर बांधकाम अनधिकृत असल्याबाबतचे नोटीस बोर्ड लावण्यात आले असल्याची माहिती क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांनी दिली आहे.



ही बांधकामे महापालिकेच्या बांधकाम नियमावली व विकास नियंत्रण नियमांचे उल्लंघन करून रेड झोन मध्ये उभारली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित बांधकाम धारकांना नोटीस बजावण्यात आली असून, या बांधकामांवर लवकरच निष्कासनाची कार्यवाही प्रस्तावित असून, नियमानुसार आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून संबंधित बांधकामे निष्कासित करण्यात येणार आहेत.शहरातील नियोजित व सुरक्षित नागरी विकासासाठी नियमभंग करणाऱ्या बांधकामांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असे महापालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

> “ महापालिकेने अनधिकृत बांधकामांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. विकास नियंत्रण नियम व सक्षम प्राधिकरणाची मंजुरी नसलेली कोणतीही बांधकामे खपवून घेतली जाणार नाहीत. अशा बांधकामांना नियमानुसार नोटिसा बजावण्यात आल्या असून, टप्प्याटप्प्याने निष्कासन कारवाई केली जाईल. नागरिकांनी मालमत्ता खरेदीपूर्वी सर्व आवश्यक परवानग्या व कागदपत्रांची पडताळणी करूनच व्यवहार करावा.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, महापालिका

महापालिकेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणतीही स्थावर मालमत्ता, फ्लॅट किंवा घर खरेदी करण्यापूर्वी संबंधित बांधकामास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी, बांधकाम परवानगी व इतर आवश्यक कागदपत्रांची काटेकोरपणे पडताळणी करावी. अनधिकृत बांधकामांमध्ये गुंतवणूक केल्यास आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

# दूषित पाणी समस्येवर तातडीने तोडगा काढा! महापौरांचा पाणीपुरवठा विभागाला अल्टीमेटम

## महापौर मंजूषा नागपूरे यांच्याकडून कुरुळी येथील भामाआसखेड पंपगृह आणि जलशुद्धीकरण केंद्राची नगरसेवकांसह प्रत्यक्ष पाहणी.

**पुणे | प्रतिनिधी**

धानोरी, टिंगरेनगर, नागपूर चाळ, शांतीनगर, विमाननगर, वडगाव शेरी परिसरात काही आवड्यांपासून पिवळसर व दुर्गंधीयुक्त पाणी येणे तसेच अनियमित पाणीपुरवठ्याच्या समस्येबाबत नागरिकांनी प्रचंड तक्रारी केल्या आहेत, याची दखल घेत पालिका प्रशासनाने यावर तातडीने तोडगा काढावा, असे आदेश महापौर मंजूषा नागपूरे यांनी दिले आहेत.

यावेळी अधिकाऱ्यांनी भामाआसखेड जलयोजनेच्या पंपगृह आणि जलशुद्धीकरण केंद्रास वीजपुरवठा करणारी चाकण-करंजविहिरे विद्युत वाहिनी वारंवार खंडित होत असल्याने पंपिंग प्रक्रिया प्रभावित होत आहे. तसेच, जलशुद्धीकरण केंद्रातून शुद्ध पाणी जाते. मात्र, पुढे ते दूषित होत असल्याचे सांगितले. यावर महापौरांनी जलशुद्धीकरण केंद्रापासून वितरण व्यवस्थेपर्यंत संपूर्ण यंत्रणेची तपासणी करण्यात यावी.

नागरिकांच्या घरांपर्यंत विविध ठिकाणांहून पाण्याचे नमुने घेऊन वैज्ञानिक तपासणी करण्यात यावी तसेच पिवळसर पाणी येण्यामागील मूळ कारण शोधून त्वरित कार्यवाही करावी, असे आदेश दिले आहेत. कुरुळी येथील येथील पंपगृह आणि जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी शनिवारी महापौरांनी या भागातील नगरसेवकांसह केली. नगरसेविका अश्विनी भंडारे, संगीता दांगट, रेखा टिंगरे, अनिल टिंगरे,

नंदिनी झेंडे, हर्षल टिंगरे, शितल सावंत, सुहास टिंगरे, श्रेयस खांदवे, अनिल सातव, ऐश्वर्या पठारे, रामदास दाभाडे, शैलजीत बनसोडे, रत्नमाला सातव, तृप्ती भरणे, सुरेंद्र पठारे, नारायण गलांडे, श्वेता गलांडे, कविता गलांडे, योगेश मुळीक, अविनाश साळवे, सायरा शेख, अश्विनी लांडगे, विशाल मलके तसेच पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता, संबंधित स्थापत्य अभियंते आणि विद्युत अभियंते यावेळी उपस्थित होते.




### दूषित पाण्याबाबत नागरिकांच्या तक्रारी वाढल्या

» धानोरी, टिंगरेनगर, नागपूर चाळ, शांतीनगर, विमाननगर आणि वडगाव शेरी परिसरात गेल्या काही आठवड्यांपासून पिवळसर व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठ्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. अनेक भागांत अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या समस्येमुळे आरोग्याच्या दृष्टीनेही चिंता व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्यानंतर महापौर मंजूषा नागपूरे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. पाणीपुरवठा यंत्रणेतील त्रुटी शोधून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले असून नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे.

### वैज्ञानिक तपासणीद्वारे शोधणार मूळ कारण

» पिवळसर आणि दुर्गंधीयुक्त पाण्याच्या समस्येचे मूळ कारण शोधण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून व्यापक तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. जलशुद्धीकरण केंद्रापासून वितरण व्यवस्थेपर्यंत संपूर्ण यंत्रणेची पाहणी केली जाणार असून विविध भागांतील पाण्याचे नमुने गोळा करून वैज्ञानिक चाचणी करण्यात येणार आहे. भामा आसखेड जलयोजनेच्या वीजपुरवठ्यात होणाऱ्या अडचणींचाही अभ्यास केला जाणार आहे. तपासणी अहवालाच्या आधारे दोषी ठिकाणे निश्चित करून आवश्यक दुरुस्ती व सुधारणा करण्यात येणार आहेत. यामुळे नागरिकांना गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.

> “स्वच्छ, सुरक्षित आणि नियमित पाणीपुरवठा करणे ही महापालिकेची सर्वोच्च प्राथमिकता आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित कोणतीही तडजोड केली जाणार नाही. संबंधित सर्व विभागांनी या समस्येचे कायमस्वरूपी निराकरण करावे, असे आदेश दिले आहेत.”
>
> - मंजुषा नागपुरे, महापौर, पुणे मनपा

# भेसळयुक्त माल जप्त; अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

## पुण्यात सोमवार पेठ, कोथरूड, हडपसर या भागांसह 17 विक्रेत्यांवर छापे टाकून सुमारे 47 लाख रुपयांचा भेसळयुक्त साठा जप्त करण्यात आला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

‘सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र’ या मोहिमेंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने पुणे आणि सातारा जिल्ह्यात छापे टाकले. त्यामध्ये भेसळयुक्त पनीर, खवा, तूप आणि अन्य अन्नपदार्थांचा साठा जप्त केला. गेल्या काही दिवसांपासून केवळ पुणे जिल्ह्यातच नाही तर राज्यभर अन्न व औषध प्रशासन विभागाने दाढीचे सत्र सुरू केले आहे. याद्वारे मोठ्या प्रमाणावर नमुने गोळा करण्यात येत असून ते तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात येत आहेत. अन्न औषध प्रशासन विभागाकडे गेल्या काही महिन्यांपासून भेसळीच्या तक्रारी येत होत्या त्याची दखल घेत प्रशासनाने पावले उचलली आहेत.

पुण्यात सोमवार पेठ, बुधवार पेठ, शुक्रवार पेठ, कोथरूड आणि हडपसर परिसरातील १७ पनीर व खवाविक्रेत्यांवर प्रशासनाने एकाच वेळी धाडसत्र राबवले. या कारवाईदरम्यान ३५ नमुने विश्लेषणासाठी गोळा करण्यात आले. तसेच, खरेदीची बिले नसलेला आणि अस्वच्छ वातावरणात साठवलेला सुमारे ४७ लाख ३६ हजार १८ रुपयांचा साठा जप्त केला आहे.

जप्त करण्यात आलेल्या पदार्थांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले असून, अहवाल आल्यानंतर संबंधित आस्थापनांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. ही कारवाई सहआयुक्त दि. वा. भोगावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे विभागातील अधिकाऱ्यांच्या पथकाने केली. सातारा जिल्ह्यातील माण आणि कराड तालुक्यांतही तूप, फरसाण व शेवविक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

येथे ४ नमुने घेण्यात आले असून, २ लाख ५९ हजार ७२० रुपये किमतीचा भेसळयुक्त साठा जप्त करण्यात आला आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या आणि भेसळयुक्त अन्न उत्पादन करणाऱ्यांविरुद्ध ही मोहीम भविष्यातही सुरू राहणार आहे. नागरिकांनी अशा प्रकारच्या गैरप्रकारांची माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.



### जप्त केलेला माल

- » खवा : १३,१२७ किलो (३४,३५,१५२ रुपये)
- » पनीर : २,८०६ किलो (७,५५,६०५ रुपये)
- » तूप : ९६० किलो (५,१६,५३६ रुपये)
- » चीज ॲनालॉग : १३८ किलो (२८,७२५ रुपये)

# पुण्यात 24 तास दुकाने सुरू, पण 'या' गोष्टींवर रात्री 10 नंतर थेट बंदी

## व्यापाऱ्यांच्या तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी स्वतंत्र 'नोडल ऑफिसर'ची नियुक्ती

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील सर्व अधिकृत, परवानाधारक दुकाने तसेच आस्थापने कायद्यानुसार २४ तास सुरू ठेवण्यास परवानगी असल्याचे स्पष्ट करत पुणे पोलिसांनी व्यापारी वर्गातील संभ्रम दूर केला आहे. मात्र, खाऊ गल्ल्या नियमाप्रमाणे दहालाच बंद होतील, असेही स्पष्ट केले आहे. व्यापारी वर्गाच्या विविध समस्या, दुकाने आणि आस्थापनांच्या वेळांबाबत निर्माण झालेला संभ्रम, पोलिसांकडून होणारी अंमलबजावणी,

तसेच व्यापारी आणि पोलीस प्रशासनात अधिक प्रभावी समन्वय निर्माण करण्याच्या उद्देशाने पुणे पोलीस आयुक्त कार्यालयात विशेष समन्वय बैठक आयोजित केली होती. या बैठकीस पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) तेजस्वी सातपुते यांच्यासह भाजपा व्यापारी आघाडीचे अध्यक्ष महेश गुप्ता आणि विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

याशिवाय व्यापाऱ्यांच्या तक्रारी व समस्यांचे जलद निवारण करण्यासाठी स्वतंत्र नोडल ऑफिसर नियुक्त करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे व्यापारी वर्ग, पोलीस प्रशासनातील संवाद अधिक प्रभावी होऊन व्यापाऱ्यांना त्यांच्या समस्या मांडण्यासाठी अधिकृत व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवत व्यापारी हित जपण्यासाठी पोलिस प्रशासन आणि व्यापारी संघटना संयुक्तपणे काम करतील, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले की, शहरातील सर्व परवानाधारक दुकाने व आस्थापने २४ तास व्यवसाय करू शकतात. मात्र, टपऱ्या, हातगाडी व्यावसायिक, फेरीवाले, पानटपऱ्या आणि तत्सम व्यवसायांना रात्री १० वाजेपर्यंत व्यवसाय करण्याची परवानगी राहील. या निर्णयामुळे शहरातील विविध भागांत दुकाने सुरू ठेवण्याच्या वेळांबाबत असलेला संभ्रम दूर झाला असून, अंमलबजावणीत एकसमानता येण्यास मदत होणार आहे. व्यापारी संघटनांनी या निर्णयाचे स्वागत केले



### परवानाधारक दुकानांना व्यवसायाची मुभा

» पुणे शहरातील सर्व अधिकृत आणि परवानाधारक दुकाने तसेच आस्थापनांना कायद्यानुसार २४ तास व्यवसाय सुरू ठेवण्यास परवानगी असल्याचे पुणे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. यामुळे दुकानांच्या वेळांबाबत व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर झाला आहे. व्यापारी संघटनांसोबत झालेल्या समन्वय बैठकीत ही भूमिका स्पष्ट करण्यात आली. शहरातील व्यावसायिक उपक्रमांना चालना देणे, रोजगाराच्या संधी वाढविणे आणि ग्राहकांना अधिक सुविधा उपलब्ध करून देणे हा या निर्णयामागील उद्देश आहे. या निर्णयामुळे शहरातील व्यावसायिक वातावरण अधिक गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### टपऱ्या आणि फेरीवाल्यांसाठी वेळेची मर्यादा कायम

» परवानाधारक दुकाने २४ तास सुरू ठेवण्यास परवानगी असली तरी टपऱ्या, हातगाडी व्यावसायिक, फेरीवाले, पानटपऱ्या आणि तत्सम व्यवसायांसाठी रात्री १० वाजेपर्यंतच व्यवसाय करण्याची परवानगी राहणार आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियंत्रण आणि नागरिकांच्या सोयी लक्षात घेऊन हा नियम कायम ठेवण्यात आला आहे. खाऊ गल्लींसह काही विशिष्ट व्यवसायांनाही लागू नियमांचे पालन करावे लागणार आहे. या स्पष्टतेमुळे अंमलबजावणीमध्ये एकसमानता येणार असून व्यापारी आणि प्रशासनातील गैरसमज कमी होण्यास मदत होणार आहे.

### व्यापारी-पोलिस संवादासाठी नोडल अधिकारी

» व्यापारी वर्गाच्या तक्रारी आणि समस्या जलदगतीने सोडवण्यासाठी पुणे पोलिसांकडून स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार आहे. व्यापारी संघटना आणि पोलिस प्रशासन यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. यामुळे व्यापाऱ्यांना त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी अधिकृत व्यासपीठ उपलब्ध होईल. विविध परवानग्या, अंमलबजावणीसंबंधी प्रश्न आणि स्थानिक पातळीवरील समस्या यावर त्वरित संवाद साधणे शक्य होणार आहे. व्यापारी हित जपत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दोन्ही बाजूंनी संयुक्तपणे काम करण्याची भूमिका बैठकीत मांडण्यात आली.

# ऐतिहासिक झाडांची कत्तल थांबणार? डॉ. नीलम गोऱ्हे यांचे मनपा आयुक्तांना पत्र

## प्राप्त झालेल्या 7 हजार हरकतींवर नागरिकांना प्रत्यक्ष बोलावून सुनावणी घेण्याची मागणी.

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशखिंड रस्त्याच्या रिझर्व्ह बँक इन्स्टिट्यूट ते संचेती चौक दरम्यानच्या ४५ मीटर रुंदीकरणासाठी प्रस्तावित ५२९ ऐतिहासिक व जुन्या वृक्षांच्या तोडीला आता तीव्र विरोध सुरू झाला असून, या प्रकरणात विधान परिषदेच्या उपसभापती तथा शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पालिकेच्या आयुक्तांना पत्र लिहून त्यांनी नियोजित वृक्षतोड तातडीने थांबवून वृक्ष संवर्धन करण्याची मागणी केली आहे.

महापालिका प्रशासनाने १ मार्च २०२६ रोजी हा प्रस्ताव वृक्ष प्राधिकरणासमोर मांडला होता. त्यानंतर २ एप्रिल रोजी जाहीर नोटीस प्रसिद्ध करून नागरिकांकडून हरकती मागविण्यात आल्या होत्या. या आवाहनाला प्रतिसाद देत पर्यावरणप्रेमी पुणेकरांनी सुमारे ७ हजार हरकती नोंदवल्या आहेत. डॉ. गोऱ्हे यांनी पत्रात नमूद केले आहे की,

महाराष्ट्र नागरी क्षेत्र वृक्ष संवर्धन नियमानुसार एवढ्या मोठ्या प्रमाणात प्राप्त झालेल्या हरकतींवर संबंधित नागरिकांना प्रत्यक्ष बोलावून सुनावणी घेणे आवश्यक आहे. तसेच, मेट्रो लाईन-३च्या पिलर्समुळे काही ठिकाणी रस्त्याची रुंदी आधीच मर्यादित झाली असल्याने केवळ वृक्षतोड करून वाहतूक कोंडीचा प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

त्यांनी पर्यावरण विषयक संस्थांनी सुचविलेल्या पर्यायी आराखड्याचाही विचार करण्याची मागणी केली आहे. उपलब्ध जागेतच सायकल ट्रॅक, पादचारी मार्ग आणि वाहतूक नियोजन करून विकासकामे करता येऊ शकतात व त्यासाठी वृक्षतोड टाळता येणे शक्य असल्याचा दावा त्यांनी केला आहे.



### परवानाधारक दुकानांना व्यवसायाची मुभा

» गणेशखिंड रस्त्याच्या रुंदीकरणासाठी प्रस्तावित ५२९ ऐतिहासिक आणि जुन्या वृक्षांच्या तोडीला वाढता विरोध होत असताना पर्यावरणपूरक पर्यायांचा विचार करण्याची मागणी जोर धरत आहे. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महापालिका प्रशासनाला पत्र पाठवून वृक्षतोड तातडीने थांबविण्याचे आवाहन केले आहे. सुमारे सात हजार नागरिकांनी हरकती नोंदविल्याने या विषयाचे गांभीर्य अधोरेखित झाले आहे. उपलब्ध जागेत सायकल ट्रॅक, पादचारी मार्ग आणि सुधारित वाहतूक नियोजन राबवून विकासकामे करता येऊ शकतात, असा पर्याय मांडण्यात आला आहे. विकासासोबत पर्यावरण संवर्धनालाही प्राधान्य देण्याची मागणी यानिमित्ताने पुढे आली आहे.